दिशाभूल की दिखाऊपणा?

दाभोलकर हत्या खटला; उच्च न्यायालयाचे तपास यंत्रणांना सवाल

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येच्या प्रकरणात प्रारंभी विकास खंडेलवाल व मनीष नागोरे यांना अटक करून संबंधित तपास अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दिशाभूल केली का? की कारवाईचा केवळ दिखाऊपणा केला? तसे असेल तर अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाणार? असे गंभीर प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआय व महाराष्ट्र पोलिस दल प्रमुखांपुढे उपस्थित केले आहेत. तसेच असे काही असल्यास न्यायालयात योग्य तो कृती अहवाल सादर केला जाईल, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

डॉ. दाभोलकर व कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्यांच्या तपासात दिरंगाई होत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी अ‍ॅड. अभय नेवगी यांच्यामार्फत याचिका केलेल्या आहेत. त्याविषयी १२ ऑक्टोबरला झालेल्या सुनावणीनंतर न्या. सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सविस्तर आदेश दिला होता. या आदेशाची प्रत नुकतीच उपलब्ध झाली आहे. त्यात खंडपीठाने अशी काही गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत. 'ज्या दिवशी डॉ. दाभोलकर यांची पुण्यात हत्या झाली होती, त्याच दिवशी (२० ऑगस्ट २०१३) ठाणे खंडणीविरोधी पथकाने कथित शस्त्रास्त्र विक्रेता मनीष नागोरी व विकास खंडेलवाल यांना अटक केली होती. त्यांच्याकडून जप्त केलेली शस्त्रे न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आली. या दोघांना नंतर महाराष्ट्र एटीएसने ऑक्टोबरमध्ये शस्त्रास्त्रे कायद्याखाली अटक केली. त्यानंतर पुणे गुन्हे शाखेने त्यांना नोव्हेंबर, २०१३मध्ये पुण्यातील सुरक्षारक्षकाच्या हत्येप्रकरणी अटक केली. नोव्हेंबरमध्येच मुंबईतील कलिना न्यायवैद्यक प्रयोगशाळेने नागोरीच्या घरातून जप्त केलेल्या एका शस्त्राचा दाभोलकर हत्येत वापर झाला असल्याचा अहवाल दिला. त्यानुसार, दोघांना दाभोलकर प्रकरणात अटक झाली. मात्र, नंतर हा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आल्यावर या दोघांना सोडून देण्यात आले. हा सारा तपास यंत्रणांचा हलगर्जीपणा आहे', असे अ‍ॅड. नेवगी यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे निदर्शनास आणले. त्याची दखल घेत खंडपीठाने आधीच्या संबंधित तपास अधिकाऱ्यांविषयी प्रश्न उपस्थित केले. तसेच याची दखल सीबीआय व महाराष्ट्र पोलिस दलाच्या प्रमुखांनी घ्यावी, असेही सुचवले.

ते काम तपास यंत्रणांचेच

'आम्ही याविषयी कोणतेही मत प्रदर्शित करत नसून संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावेळी ही अटक कारवाई जाणीवपूर्वक दिशाभूल करण्यासाठी किंवा कारवाईचा दिखाऊपणा करण्यासाठी केली होती का, हे तपासण्याचे काम संपूर्णपणे केवळ अशा तपास यंत्रणांचे आहे', असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. तसेच असा हलगर्जीपणा निदर्शनास आलेला असल्यास त्याविषयी कृती अहवाल सादर केला जाईल, अशी अपेक्षाही खंडपीठाने व्यक्त केली. या प्रकरणाची आता पुढची सुनावणी ७ डिसेंबरला होणार आहे.

सिलिंडर दरवाढीविरुद्ध राष्ट्रवादीचे आंदोलन

शैलेश जाधव

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात दीड वर्षात १९ वेळा वाढ करण्यात आल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात शुक्रवारी सकाळी आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली.

'कहाँ गये, कहाँ गये; अच्छे दिन कहाँ गये', 'देश की जनता रो रही है, मोदी सरकार सो रही है', 'हर हर जुमला, घर घर जुमला', अशा घोषणा देत आंदोलनकर्त्या महिलांनी सीएसएमटी परिसर दणाणून सोडला. भाजपच्या राजवटीत १८ महिन्यांमध्ये जवळजवळ १९ वेळा घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढले आहेत. यामुळे ग्रामीण महिलांसह सामान्यांचे बजेट कोलमडले आहे, असा आरोप वाघ यांनी केला. संपूर्ण राज्यात उज्ज्वला गॅस योजनेचे भलेमोठे बॅनर भाजप सरकारने लावले असून, त्या योजनेवर महिलांचा सन्मान असे लिहिले आहे. दरवाढ हाच महिलांचा सन्मान आहे का, असा सवाल उपस्थित करत ही योजना नागरिकांच्या डोळ्यांत धूळफेक करणारी असल्याची टीका वाघ यांनी केली. दरम्यान, आंदोलनानंतर पोलिसांनी या निदर्शकांना ताब्यात घेतले.

मुंबई TIMES संवाद

रविवार, ५ नोव्हेंबर २०१७

गुजरातच्या निवडणुकीवर राहुल गांधींचा उदय

गुजरातमध्ये पिसाटलेल्या 'विकासा'वर स्वार होत राहुल गांधींनी भाजपच्या नाकात दम आणला आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत गुजरातच्या अस्मितेला ऐरणीवर आणणाऱ्या मोदींसाठी ही निवडणूक एकतर्फी ठरणार नाही, हे खरे!... सुनील चावके

प्रतीक : प्रीतिचे की विद्वेषाचे?

ताजमहाल की तेजोमहाल हा वाद जुना असला, तरी त्याचे आता नव्याने राजकारण करण्याचे उद्योग सत्तारूढ पक्षातील नेत्यांनी सुरू केलेत. त्यानिमित्ताने ताजमहालच्या वस्तुस्थितीचा वेध... अब्दुल कादर मुकादम

रेल्वेमृत्यू रोखायचे कसे?

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत रेल्वे अपघातात मृत्यू पावणाऱ्यांची संख्या भारतातच नाही, तर जगात सर्वाधिक आहे. वर्षाला तीन हजार बळी घेणाऱ्या रेल्वे अपघातांचा घेतलेला मागोवा... हेमंत साटम

याशिवाय 'तिचं जग'मध्ये डॉ. अंजली जोशी, 'खुली खिडकी'मध्ये शर्मिष्ठा भोसले आणि 'शतदा प्रेम करावे'मध्ये संगीतकार अशोक पत्की

'त्या' दिवसांबाबत विद्यार्थिनींचे प्रबोधन

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

विद्यार्थिनींची मासिक पाळीदरम्यानची शाळेतील गैरहजेरी कमी करण्यासाठी तसेच त्यांच्यात मासिक पाळी संदर्भातील गैरसमज दूर करून प्रबोधन करण्यासाठी एक विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. राज्यातील सर्व उच्च प्राथमिक व त्यावरील शाळांमध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे 'स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय' अभियानांतर्गत हा उपक्रम राबविण्यात येईल.

मासिक पाळीबाबतचे गैरसमज दूर करणार

युनिसेफने काही दिवसांपूर्वी राज्यातील नगर, औरंगाबाद, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जालना व ठाणे जिल्ह्यांत एक सर्वेक्षण केले होते. त्यानुसार राज्यातील ११ ते १९ वयोगटातील फक्त १३ टक्के मुलींना पहिली पाळी येण्याअगोदर यासंदर्भात माहिती होती असे दिसून आले. तसेच, मासिक पाळीदरम्यान शाळेकडे पाठ फिरविणाऱ्या मुलींची संख्या ६० ते ७० टक्के होती. या पार्श्वभूमीवर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा, पुरेशा प्रमाणात सॅनिटरी पॅडची उपलब्धता, त्यांची विल्हेवाट लावण्याची सुविधा आदी गोष्टींचा यात समावेश आहे. या उपक्रमाचा फायदा केवळ शाळकरी मुलीच नाही तर अन्य मुली, महिलांनाही होणार आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र' कृतीदलाची स्थापना करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रासाठी आयुक्त, जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि नगरपालिका क्षेत्रात नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे या कृतीदलाचे प्रमुख म्हणून काम पाहतील. याबरोबरच यामध्ये माध्यमिक शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियानाचे कार्यकारी अभियंता, लिंग समभाव समन्वयक, क्रियाशील शिक्षक (पुरुष आणि महिला) हे सदस्य असतील तर प्राथमिक शिक्षणाधिकारी या दलाचे सदस्य सचिव राहणार असून या उपक्रमाची संपूर्ण अंमलबजावणी व त्याच्या संनियंत्रणाची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

कृतीदलाने सुचविलेल्या महिला प्रतिनिधी/ महिला अधिकारी/ सदस्य यांना युनिसेफ आणि पुण्यातील विद्या प्राधिकरणाकडून राज्यस्तरीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या मास्टर ट्रेनरच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व शाळांतील महिला शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात येईल. हे प्रशिक्षण सहा सत्रांतून देण्यात येईल. यामध्ये मासिक पाळीविषयी माहिती देणे, मासिक पाळीदरम्यान उद्भवलेल्या आव्हानांना हाताळणे, मासिक पाळीच्या दिवसांत पाळावयाची स्वच्छता व आरोग्य, शोषके (सॅनिटरी पॅड) योग्य पद्धतीने हाताळणे, मासिक पाळीविषयीच्या अंधश्रद्धा व गैरसमजुती दूर करणे आदी गोष्टींचा समावेश असेल.

शालेय अभ्यासक्रम ई-लर्निंग वेबसाइटवर

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

युवा सेनच्या वतीने ई-लर्निंगच्या वेबसाइटचे शुक्रवारी प्रकाशन करण्यात आले. याद्वारे आठवी ते दहावीचा अभ्यासक्रम इंग्रजी, मराठी व सेमी इंग्रजी स्वरूपात मोफत उपलब्ध होणार आहे.

युवा सेना अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी मुलुंड येथील कालिदास नाट्यगृहात विद्यार्थी व शिक्षकांना या उपक्रमाबाबतची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. यावेळी अडीच हजार विद्यार्थ्यांना या उपक्रमाबाबतच्या प्रोमोकोडचे वाटप करण्यात आले. हा ई-लर्निंग कार्यक्रम स्मार्ट फोन, टॅबलेट लपटॉप तसेच कॉम्प्युटरवरही चालू करता येणार आहे.

नवनीत इसेन्स लर्निंगच्या वतीने हा प्रोग्रॅम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमात ऑटोमेटेड इंटरव्हेंशन, आत्मपरीक्षण, कौशल्य विकास, ॲनिमेशन चित्र, प्रश्नोत्तरे यांचा समावेश असून, याद्वारे विद्यार्थी घरबसल्या अभ्यास करू शकणार आहेत. विशेष म्हणजे ते घरी बसून परीक्षाही देऊ शकणार असल्याने त्यांची परीक्षेबद्दलची भीती मोडेल, असा विश्वास आदित्य यांनी यावेळी व्यक्त केला.

पाणथळीवर भराव टाकल्यास जबर दंड

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

पाणथळ जागा वाचवण्यासंदर्भात सुरू असलेल्या प्रयत्नांना आणखी बळ मिळाले आहे. यापुढे खाजगी पाणथळ जागेवर भराव टाकल्यास तो भराव काढण्यासाठी जमीन मालकाला जबर दंड आकारला जाणार आहे. दंड भरण्यास नकार दिल्यास त्या रकमेच्या थकबाकीची नोंद जमीनमालकाच्या सातबारा उताऱ्यावर होईल. त्यामुळे भविष्यात ती जमीन विकणे संबंधितांना दुरापास्त होणार आहे.

वसई आणि ठाण्यात अशा स्वरूपाची कारवाई झाल्याने पाणथळीच्या जागा नष्ट करण्याच्या प्रकारास पायबंद बसण्यास मोठी मदत होत आहे. पाणथळ जागांवर भरावानंतर बांधकामे करून पाणथळ जागांचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे पाणथळ जागा नामशेष होऊन पर्यावरणाची साखळी आणि समतोल बिघडताना दिसत आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने या जागांचे संवर्धन करण्यासाठी समिती नेमण्याची सूचना राज्य सरकारला केली होती. त्यानुसार काही महिन्यांपूर्वी समितीही स्थापन झाली आहे. पाणथळ जागांवर भराव टाकला जात असेल तर या समितीकडे त्या संदर्भातील तक्रारी करता येतात. या तक्रारींची छाननी करून पुढील कार्यवाही केली जाते.

विशेष सरकारी समिती ठेवणार लक्ष

त्याही पुढे जावून या जागांवर घाला घालणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी समितीने आणखी कडक पावले उचलली आहेत. त्यानुसार वसई आणि ठाण्यात कारवाई झाली आहे. वसईत एका जमीनमालकाने स्वत:च्या खाजगी जमिनीवरील पाणथळ जागेवर भराव टाकला होता. हा भराव काढण्यासाठी समितीने त्या व्यक्तिला १९ लाख २८ हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे. भराव काढून ती जागा पूर्ववत करण्यासाठी तेवढा खर्च येणार आहे. हा खर्च त्याच व्यक्तिकडून वसूल केला जाणार आहे. दंड भरण्यास नकार दिल्यास संबंधिताच्या सातबाऱ्यावर या थकबाकीची नोंद होईल.

ठाण्यातील कोपरी आणि साकेत भागांतूनही अशाच स्वरूपाच्या तक्रारी आल्या होत्या. या प्रकरणी एकावर गुन्हा नोंदविला आहे. त्या भागात तिवरांची २० हजार रोपटी लावून त्यांचे जतन केले जाणार आहे, अशी माहिती ठाणे तहसीलदार कार्यालयाचे उपविभागीय अधिकारी सुधाकर परदेशी यांनी दिली. दंडात्मक कारवाईचे वसई मॉडेल आता अन्य ठिकाणीही वापरण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. पाणथळ जागांचे संवर्धन करण्याबाबत आणखी कशाप्रकारे कारवाई करता येईल याविषयी अनेक बैठकांमध्ये विचारविनिमय सुरू असतो. वसई विभागातील अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे, असे समितीचे सदस्य जयराम गौडा यांनी सांगितले.

इथे नोंदवा तक्रार

पाणथळ जागा नष्ट केल्या जात असतील तर नागरिक १९२६ या क्रमांकावर तक्रारी करू शकतात. पाणथळ जागा, त्यासंदर्भात संबंधितांवर दाखल झालेले गुन्हे याची माहिती देण्यासाठी समिती लवकरच एक वेबसाइट सुरू करणार आहे.

सर्वाधिक प्रतिक्रिया मिळालेली बातमी

देवदर्शनाहून येताना अपघात, ३ ठार

बुलडाण्यातील जाईचा देव येथून देवदर्शनाहून परतताना विकांचे वाहन उलटले. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला.

मटा ॲप डाऊनलोड करा app.mtmobile.in
मिस्ड् कॉल द्या 1800-103-8973

दिल्लीच्या पोलिसाविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

लष्कर-ए-तोयबा दहशतवादी संघटनेचा अबु जुंदाल याच्याविरुद्ध सुरू असलेल्या '२६/११' हल्ला खटल्याच्या सुनावणीत समन्स बजावूनही साक्ष देण्यासाठी हजर न झालेले दिल्लीतील सहायक पोलिस आयुक्त मनिषी चंद्रा यांच्याविरुद्ध विशेष न्यायालयाचे न्या. जी. ए. सानप यांनी शुक्रवारी अजामीनपात्र वॉरंट बजावले.

चंद्रा यांनी अबु जुंदाल व सय्यद झबिउद्दीन अन्सारी या दोघा दहशतवाद्यांना अटक केली होती. त्यामुळे त्यांची खटल्यातील साक्ष महत्त्वाची आहे. त्याकरिता चंद्रा यांना वारंवार बोलावूनही ते अद्याप न्यायालयात साक्षीसाठी हजर झालेले नाहीत. तपासकामात व्यस्त असल्याने येऊ शकत नसल्याचे चंद्रा यांनी कळवले होते. मात्र, 'या खटल्याची सुनावणी लवकरात लवकर पूर्ण करायची असून त्यादृष्टीने साक्षीसाठी तारीख ठरवून ती खूप आधी कळवूनही चंद्रा हे कागदपत्रांसह साक्षीसाठी हजर झालेले नाहीत. यासंदर्भातील कागदपत्रे पाहिल्यानंतर साक्षीदाराने वाजवी कारणास्तव न्यायालयात येणे टाळले नसल्याचे स्पष्ट होते. पतियाळा न्यायालयातील अधिकाऱ्याने कळवल्यानंतरही चंद्रा यांनी येण्याचे टाळले असून हे गंभीर आहे. पोलिस अधिकाऱ्याने साक्षीपुराव्यांच्या खटल्याला प्राधान्य द्यायला हवे. त्यामुळे एकंदरीत स्थिती पाहता चंद्रा यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढणेच योग्य होईल', असे न्यायाधीशांनी आदेशात नमूद केले. यावेळी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी साक्षीदाराला शेवटची संधी द्यावी, अशी विनंती केली, मात्र ती न्यायाधीशांनी फेटाळली.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
सी.बी.कोरा इंस्टीट्युट, शिंपोली गाव, म्युनसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)

- ॲडव्हान्स ब्युटीशियन कोर्स Fees 9740/-
- सी सी टी वी सर्व्हिलन्स इन्स्टॉलेशन एन्ड सर्व्हिसिंग Fees 7380/-

रेग्युलर बॅचेस् सुरू होत आहेत
प्रात्यक्षिकांसहीत प्रशिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन
सरकारी योजनांची माहिती व शासकीय प्रमाणपत्र
KVIC ची २५ लाखापर्यंतची कर्ज योजना
9987138277 / 9324319914
022-2898 8581

GODFREY PHILLIPS INDIA LIMITED
REGISTERED OFFICE : 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033
CORPORATE OFFICE : 49, Community Centre, Friends Colony, New Delhi - 110 025
CIN : L16004MH1936PLC008587
Website : www.godfreyphillips.com; Email : isc-gpi@modi.com

NOTICE

Pursuant to Regulation 29(1)(a) read with Regulation 47(1)(a) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, it is hereby notified that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Saturday, the 11th November, 2017 at 11:45 A.M. to, inter-alia, consider, approve and take on record of the Standalone Unaudited Financial Results for the second quarter and half year ended 30th September, 2017.

The information contained in this notice is also available on the Company's Corporate, website www.godfreyphillips.com and on the website of the stock exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com.

For GODFREY PHILLIPS INDIA LIMITED
Sd/-
Place : New Delhi **(SANJAY GUPTA)**
Dated : 3rd November, 2017 **COMPANY SECRETARY**

पंचायत राजसाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण संस्था

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींसाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली. पंचायत राज व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन, त्यांच्या क्षमता बांधणीतून निर्णय प्रक्रियेतील विकेंद्रीकरण यशस्वी होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी राज्यघटनेच्या ७३ व ७४व्या घटना दुरुस्तीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राज्य निवडणूक आयोग, ग्रामविकास विभाग, मुंबई विद्यापीठ आणि पुण्यातील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोपात मुख्यमंत्र्यांनी वरील माहिती दिली.

या महत्त्वपूर्ण घटना दुरुस्तीच्या रौप्य महोत्सवानिमित्त राज्यात पहिली राष्ट्रीय परिषद होणे हे अभिमानास्पद आहे. घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बळकटी करण्याचा पाया घातला गेला. स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान लोकशाहीत निश्चितच अन्य संसदीय संस्थांप्रमाणेच महत्त्वाचे आहे. लोकशाहीतील महिलांचे स्थानही या घटना दुरुस्तीमुळे बळकट झाले आहे. अधिकारांचे विकेंद्रीकरण निश्चितच करावे लागेल. पण त्यासाठी मानसिकताही बदलावी लागेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पंचायत राज संस्था बळकटी करण्याचा उपक्रम महाराष्ट्र यशस्वी करू शकतो, असा विश्वास या विषयातील तज्ज्ञ जॉर्ज मॅथ्यू यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या क्षेत्रातील दृष्टिकोनाचा आणि नेतृत्वाचा गौरवाने त्यांनी उल्लेख केला. याप्रसंगी राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आयोगाच्या उपक्रमाची माहिती दिली.

महाराष्ट्र टाइम्स प्रस्तुत
मोफत सेमिनार

मार्गदर्शन एमबीए-सीईटीचे

एमबीए-सीईटी या प्रवेश परीक्षेला आता चारच महिने उरले आहेत. या महत्त्वपूर्ण परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र टाइम्स आणि T.I.M.E. यांनी खास मार्गदर्शनपर सेमिनार्सचे आयोजन केले आहे.

चर्चिले जाणारे मुद्दे:

- सीईटीसाठीची पात्रता • निवड प्रक्रिया • आघाडीची कॉलेजेस आणि सरासरी वेतन • एमएमएस करावे की पीजीडीएम?
- सीईटी २०१८ ची तयारी कशी करावी?

विभाग १: मॅथ्स+डेटा इण्टरप्रिटेशन+डेटा सफिशिअन्सी
विभाग २: व्हर्बल एबिलिटी+ रिडिंग कॉम्प्रिहेन्शन
विभाग ३: लॉजिकल आणि क्रिटिकल रिझनिंग

- सीईटी २०१७ ची ठळक वैशिष्ट्य • परीक्षेसाठीची धोरणे

ही सेमिनार्स T.I.M.E. च्या पुढील सेण्टर्समध्ये होतील

दिनांक	सेण्टर	वेळ	संपर्क
४ नोव्हेंबर, २०१७	बोरिवली	संध्या. ६ ते ८	२८९०९०३१/२८९०९०३२
४ नोव्हेंबर, २०१७	वाशी	संध्या. ६ ते ८	२७८९४५२८/६७९११०८७
५ नोव्हेंबर, २०१७	ठाणे	सकाळी ११ ते १	६५६८३५८२/४१२७६५०५
५ नोव्हेंबर, २०१७	दादर	सकाळी ११ ते १	२४१२१६२६/२४११६०३७
५ नोव्हेंबर, २०१७	अंधेरी	सकाळी ११ ते १	२६८२२१३४/२६८३३१७७

जाहिर निवेदन

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शाळांना व पालकांना कळविण्यांत येते की, सन २०१७-१८ या वर्षापासून समाज कल्याण अधिकारी बृहन्मुंबई या कार्यलयामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्याकरिता (अनुसूचीत जाती, विमुक्त व भटक्या जाती, विशेष मागास प्रवर्ग) राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे अर्ज https://mahadbt.gov.in/ या संकेतस्थळावर भरावेत.

सदर संकेतस्थळावरील योजनेचा लाभ मिळणेकरिता मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आधारकार्ड त्यांच्या स्वत:च्या नांवे असलेल्या बँक खात्याशी लिंक करुन घ्यावे. तसेच योजनेचा अर्ज भरणेबाबत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी संपर्क साधावा.

स्वाक्षरी/-
समाज कल्याण अधिकारी,
बृहन्मुंबई

डीजीआयपीआर/२०१७-१८/क्र.-५/सी-३९४५

भारत सरकार

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय अतिरिक्त संचालक यांचे कार्यालय केंद्र सरकार आरोग्य योजना, मुंबई

सीजीएचएस अहमदाबाद, मुंबई, नागपूर, पुणे येथे एकत्रित रिक्त पदांसाठी भर्ती करिता जाहीरात

केंद्र सरकार आरोग्य योजना अहमदाबाद, मुंबई, नागपूर आणि पुणे येथे खालील रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन भर्ती अर्ज मागवण्यात येत आहेत. उमेदवार https://cghsrecruitment.mahaonline.gov.in येथे **केवळ ऑनलाईन अर्ज** करू शकतात.

पद	सीजीएचएस शहर	यूआर	ओबीसी	एससी	एसटी	एकूण	ईएक्सएस	एचएच
फार्मासिस्ट (अ‍ॅलोपॅथी)	अहमदाबाद	–	४	३	–	७	१	–
	मुंबई	६	४	–	२	१२	१	–
	नागपूर	८	२	–	–	१०	२	१
	पुणे	६	४	–	–	१०	१	–
फार्मासिस्ट तथा क्लर्क (होमिओपॅथी)	अहमदाबाद	१	–	–	–	१	–	–
	मुंबई	१	१	१	–	३	–	–
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	१	१	–	–	२	–	–
फार्मासिस्ट (आयुर्वेद)	अहमदाबाद	१	–	–	–	१	–	–
	मुंबई	२	–	१	–	३	–	–
	नागपूर	–	१	१	–	२	–	–
	पुणे	१	–	–	–	१	–	–
नर्सिंग ऑफिसर (ग्रे.-I)	अहमदाबाद	१	–	–	–	१	–	–
	मुंबई	५	३	–	–	८	१	–
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	३	१	–	–	४	–	–
प्रयोगशाळा तंत्रज्ञ	अहमदाबाद	१	१	–	–	२	–	–
	मुंबई	३	१	–	१	५	–	–
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	२	–	–	–	२	–	–
प्रयोगशाळा सहायक	अहमदाबाद	१	–	–	–	१	–	–
	मुंबई	२	–	–	–	२	–	–
	नागपूर	१	–	–	–	१	–	–
	पुणे	१	–	–	–	१	–	–
ए.एन.एम.	अहमदाबाद	–	–	–	–	–	–	–
	मुंबई	५	२	१	१	९	–	–
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	–	–	–	–	–	–	–
डेंटल टेक्निशियन	अहमदाबाद	–	–	–	–	–	–	–
	मुंबई	१	–	–	–	१	–	–
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	–	–	–	–	–	–	–
लेडी हेल्थ व्हीजीटर	अहमदाबाद	–	–	–	–	–	–	–
	मुंबई	८	३	१	१	१३	–	१
	नागपूर	–	–	–	–	–	–	–
	पुणे	–	–	–	–	–	–	–
ईसीजी तंत्रज्ञ	अहमदाबाद	–	–	–	–	–	–	–
	मुंबई	१	–	–	–	१	–	–
	नागपूर	१	–	–	–	१	–	–
	पुणे	–	–	–	–	–	–	–

यूआर – अनारक्षित; **ओबीसी** – इतर मागासवर्गीय; **एससी** – अनुसूचित जात; **एसटी** – अनुसूचित जमात; **ईएक्सएस** – एक्स – सर्व्हिसमन; **एचएच** – कर्ण बधीर, मुंबई येथील रिक्त पदांपैकी एक फार्मासिस्ट (अ‍ॅलोपॅथी) आणि एक नर्सिंग ऑफिसर (ग्रे.-I) हे सीजीएचएस वेलनेस सेंटर, गोवाकरिता राखून ठेवले आहेत.

अर्जांकरिता समाप्तीची तारीख: ह्या जाहीरातीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून म्हणजेच ०४/११/२०१७ पासून ०४/१२/२०१७ पर्यंत तीस दिवस. पात्रता आणि इतर तपशिलांकरिता कृपया https://cghsrecruitment.mahaonline.gov.in ला भेट द्या.

मुंबई व गोवा उमेदवारांकरिता, ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता केंद्र मुंबई असेल. प्रवास खर्च देण्यात येणार नाही. दर्शवण्यात आलेली रिक्त पदांची संख्या ही साधारण आहे आणि प्रत्यक्षात बदलू शकते.

मध्य रेल्वे

दि. ०५.११.२०१७ रोजी मेगा ब्लॉक

मध्य रेल्वेकडून परिरक्षण कार्य करण्यासाठी मेन लाइन व हार्बर लाइनवर दि. ०५.११.२०१७ रोजी मेगा ब्लॉक करण्यात येत आहे.

दिवा – कल्याण डाऊन तेज मार्ग सकाळी ११.२० वाजेपासून दुपारी ४.२० वाजेपर्यंत

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून सुटणाऱ्या डाऊन तेज व अर्धजलद सेवा स. ९.२५ ते दु. २.५४ या वेळेत त्यांच्या संबंधित निर्धारित थांब्यांव्यतिरिक्त घाटकोपर, विक्रोळी, भांडूप व मुलुंड स्थानकावरही थांबतील.
- ठाणेपलीकडे जाणाऱ्या डाऊन तेज मार्गावरील गाड्या ठाणे ते कल्याण दरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळविण्यात येतील ज्या सर्व स्थानकांवर थांबतील व आपल्या गंतव्य स्थानी निर्धारित वेळेच्या २० मिनिटे विलंबाने पोहोचतील.
- स. १०.३७ ते दु. ३.०६ या वेळेत अप तेज/अर्धजलद मार्गावरील सेवा कल्याण स्थानक सोडताना त्यांच्या संबंधित निर्धारित थांब्यांव्यतिरिक्त दिवा, मुलुंड, भांडूप, विक्रोळी, घाटकोपर व कुर्ला स्थानकावर थांबतील व आपल्या गंतव्य स्थानी निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे विलंबाने पोहोचतील.
- स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटणाऱ्या/येणाऱ्या सर्व डाऊन व अप धीम्या लोकल आपल्या गंतव्य स्थानी निर्धारित वेळेच्या १० मिनिटे विलंबाने पोहोचतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–चुनाभट्टी/बांद्रा डाउन हार्बर लाइनवर सकाळी 11.40 वाजेपासून 4.40 वाजेपर्यंत

तसेच

चुनाभट्टी/बांद्रा – छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस अप हार्बर लाइनवर सकाळी 11.10 वाजेपासून 4.10 वाजेपर्यंत

- वाशी/बेलापूर/पनवेलकरिताच्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा वडाळा रोड सोडताना स. ११.३४ ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून सुटणाऱ्या सेवा सायं. ४.४७ पर्यंत तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून वांद्रे/अंधेरीकरिता सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा स. ९.५६ ते दु. ४.४३ या वेळेत रद्द असतील.
- पनवेल/बेलापूर/वाशीहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करिता सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा स. ९.५३ ते दु. ३.२० या वेळेत व वांद्रे/अंधेरीहून सुटणाऱ्या सेवा स. १०.४५ ते सायं. ५.०९ या वेळेत रद्द असतील.
- तथापि, ब्लॉकच्या कालावधीत पनवेल ते कुर्ला (प्लॅटफॉर्म क्र. ८) दरम्यान विशेष सेवा चालविण्यात येतील.
- हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉकच्या कालावधीदरम्यान स. १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत मेन लाइन व पश्चिम रेल्वेमार्गे प्रवास करण्याची मुभा असेल.

सदर ब्लॉक्समुळे उपनगरीय लोकल गाड्यांना नेहमीपेक्षा जास्त गर्दी असण्याची शक्यता आहे. प्रवाशांनी प्रवास करताना कृपया कोणतीही जोखीम पत्करू नये. त्यांनी कृपया लोकलचे फूटबोर्ड वा छतांवरून प्रवास करण्याचे टाळावे तसेच अत्यंत गर्दी असलेल्या गाड्यांमध्ये चढू नये. इन्फ्रास्ट्रक्चरची देखभाल व सुरक्षिततेसाठी सदर मेन्टेनन्स ब्लॉक्स आवश्यक आहेत. प्रवाशांना विनंती आहे की, होणाऱ्या गैरसोयीबद्दल त्यांनी रेल्वे प्रशासनाशी सहकार्य करावे.

698

उज्ज्वल उद्याकरिता कार्यरत